# विकोची 'गोल्डन' भरारी



मुंबई, दि. १ (प्रतिनिधी) – सौंदर्यप्रसाधनांसह दर्जेदार आयुर्वेदिक उत्पादनांसाठी देशविदेशात नावलौकिक मिळवलेल्या 'विको'ला आतंरराष्ट्रीय 'गोल्डन ग्लोब टायगर' पुरस्कार प्राप्त झाला आहे. कौलालंपूर, मलेशिया येथे झालेल्या दिमाखदार सोहळ्यात सी. एम. ओ. एशियाचे संचालक आलोक पंडित यांच्या हस्ते विको उद्योग समुहाचे संजीव पेंढारकर यांना हा पुस्करार देऊन गौरविण्यात आले.

दर्जेदार आयुर्वेदिक उत्पादनांमुळे अबालवृद्ध विकोच्या उत्पादनांना पहिली पसंती देतात. त्यामुळेच्या गेल्या ६५ वर्षांपासून ही उत्पादनांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. उद्योग जगतात असणाऱ्या प्रचंड स्पर्धेचा सामना करीत 'विको'ने आपला दर्जा कायम ठेवला आहे. याआधी 'विको'ला 'माल्टा', कॉर्पोरेट एक्स्कलन्स पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. या पुरस्कारामुळे जागतिक पातळीवर मराठी माणसाच्या उद्योगशीलतेला मानाचे स्थान मिळणार असल्याचे प्रतिपादन विकोचे संचालक संजीव पेंढारकर केले. या पुरस्कार सोहळ्यात आयोजित केलेल्या 'उत्कृष्ट संघटन आणि नूतन नेतृत्त्व' या विषयावर जगभरातील उद्योजकांबरोबर पेंढारकर यांनीही चर्चेत सहभाग घेतला.